# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक :—** क्र.सीटीएयु/२३/२०२१—२०२२

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानीत/विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, नृत्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे सुधारीत दर लागू करण्याबाबत शासनाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण—२०२१/(७५/२१)/मशि—३, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ अन्वये आदेश निर्गमित केले आहे. सदर शासन निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २१/११/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र. १४ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली असून सदरच्या शासन निर्णयाप्रमाणे महाविद्यालय/संस्था स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०२११०२२१८३२५२७८०८ आहे.

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :—२५ जानेवारी, २०२२

(सुधीर पुराणिक)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानीत/विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, नृत्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. हे.पं. बाविस्कर, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई—४०० ०३२.
२. मा. डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — ४११ ००१.
३. मा. सह—संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१.
४. मा. सह—संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा — रायगड — ४१० २०६.
५. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
८. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई — ४०० ०९८.
९. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).
१०. सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२ **(व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २१/११/२०२१रोजीच्या बैठकीत बाब क्र.१४)** कार्यवाही अहवालाकरीता.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/ संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/ तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२१/(७५/२१)/(१)/मशि-३,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२१.

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- टीईडी-२००८/(१८३)/०८/तांशि-५, दिनांक ०५ नोव्हेंबर,२००८.

२) शासन निर्णय,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- संकीर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८.

**प्रस्तावना :**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सैध्दांतिक, प्रात्याक्षिके इत्यादी कामांकरीता संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये लागू करण्यात आलेले मानधनाचे दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वांगीन विचार करुन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार | सुधारित दर (प्रति तासाकरीता) | |
|---|---|---|---|
| | | सैद्धांतिक | प्रात्याक्षिके |
| १ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी) | रु.६२५/- | रु.२५०/- |
| २ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदव्युत्तर) | रु.७५०/- | रु.३००/- |
| ३ | शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु.७५०/- | रु.३००/- |
| ४ | विधी (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु.७५०/- | रु.३००/- |

२. सदरहू सुधारित दर दिनांक ०१ ऑक्टोंबर, २०२१ पासून अनुज्ञेय होतील.

३. वरील सुधारीत दर पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१) शासकीय महाविद्यालये/संस्था यामधील अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांसाठी संदर्भाधिन क्र.१) येथील शासन निर्णय, दिनांक ०३/११/२००८ मधील नमूद अटी कायम राहतील.

२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना संदर्भाधिन क्र.२) येथील शासन निर्णय, दिनांक १४/११/२०१८ मधील परि.क्र.२ मध्ये नमूद अटी कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.८२०/२०२१/व्यय-५, दिनांक ०८/०९/२०२१ नुसार प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र. २०२११०२२१८३२५२७८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Hemantkumar Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec54206 33722d42e0976d82a8, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2021.10.22 18:36:39 +05'30'

**( हे.पं.बाविस्कर )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी.
८. निवड नस्ती, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.